# महाराष्ट्र शासन
## महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी, मुंबई

महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय, विद्यानगरी, हंस भुग्रा मार्ग, संताक्रुझ पूर्व, मुंबई ४०० ०९८
दूरध्वनी क्रमांक ०२२-२६६७७५५५

**पाठयक्रम :**

१. अग्निशामक प्रशिक्षण पाठयक्रम (फक्त पुरुष उमेदवारांकरीता) –
(कालावधी –जानेवारी २०२६ ते जुन-२०२६ व जुलै-२०२६ ते डिसेंबर-२०२६)

२. उपस्थानक व अग्निप्रतिबंधक अधिकारी पाठयक्रम (फक्त पुरुष उमेदवारांकरीता- पाठयक्रमाची क्षमता ४० )
(कालावधी – जुलै-२०२६ ते जुन-२०२७)

तरुण व होतकरु तरुण उमेदवारांकरीता जे आपले भविष्य अग्निशमन सेवेमध्ये अग्निशामक/अधिकारी म्हणून कारकिर्द करु इच्छितात त्यांचेकरीता महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी व प्रादेशिक अग्निशमन प्रशिक्षण केंद्र येथे प्रशिक्षण पाठयक्रम दरवर्षी आयोजित करतात. अग्निशामक पाठयक्रम (कालावधी ०६ महिने) व अधिकारी पाठयक्रम (कालावधी ०१ वर्ष हे दोन्ही पाठयक्रम निवासी असून या पाठयक्रमातून सार्वजनिक व औद्योगिक अग्निशमन सेवेमध्ये संधी मिळावी या दृष्टीकोनातून हे पाठयक्रम आयोजित करण्यांत येतात.

अग्निशमन सेवेची वाटचाल बघता व त्याच प्रमाणात उंच इमारती, हॉस्पिटल, मॉल्स, मल्टीप्लेक्स व औद्योगिक क्षेत्रात अग्निशामक /अधिकारी यांची मोठया प्रमाणात मागणी असून त्या आधारे प्रशिक्षणार्थी प्रशिक्षित केले जातात.

**प्रवेशासाठी पात्रता :**

खाली नमूद केल्याव्यतिरिक्त अर्जदार हा महाराष्ट्राचा रहिवाशी असला पाहिजे व त्यास मराठी भाषा येणे गरजेचे आहे. सदर बाब शैक्षणिक व कागदपत्रांची पडताळणीच्या वेळी बघितली जाईल).

| अटी /शर्ती | अग्निशामक पाठयक्रम | उपस्थानक अधिकारी व अग्निप्रतिबंधक अधिकारी पाठयक्रम |
|---|---|---|
| वय | १८ ते २३ वर्षे (ऑनलाईन अर्ज भरण्याच्या प्रथम दिवशी उमेदवाराचे वय १८ वर्षे पूर्ण पाहिजेत). (अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती/विमुक्त जाती/भटक्या जमाती/विशेष मागास प्रवर्गाकरीता ५ वर्षे शिथिल व इतर मागासवर्गीय/ईडब्ल्यूएस उमेदवारांसाठी ०३ वर्षे शिथिल) | १८ ते २५ वर्षे (ऑनलाईन अर्ज भरण्याच्या प्रथम दिवशी उमेदवाराचे वय १८ वर्षे पूर्ण पाहिजेत). (अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती/विमुक्त जाती/भटक्या जमाती/विशेष मागास प्रवर्गाकरीता ५ वर्षे शिथिल व इतर मागासवर्गीय/ईडब्ल्यूएस उमेदवारांसाठी ०३ वर्षे शिथिल) |

| | | |
|---|---|---|
| शैक्षणिक पात्रता | मान्यताप्राप्त संस्थेतून मराठी विषयासह पहिल्या प्रयत्नात किमान एस.एस.सी.उत्तीर्ण (५० टक्के खुल्या प्रवर्गासाठी व ४५ टक्के (अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती/विमुक्त जाती/भटक्या जमाती/विशेष मागास प्रवर्ग /इतर मागासप्रवर्ग/ईडब्ल्यूएस उमेदवारांकरीता) | मान्यताप्राप्त विदयापीठातून पदवी उत्तीर्ण (५० टक्के खुल्या प्रवर्गासाठी व ४५ टक्के (अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती/विमुक्त जाती/भटक्या जमाती/विशेष मागास प्रवर्ग /इतर मागास प्रवर्ग/ईडब्ल्यूएस प्रवर्गातील उमेदवारांकरीता) |
| शारीरिक पात्रता | उंची १६५ सें.मी. (किमान)<br>वजन ५० किलो (किमान)<br>छाती ८१ सें.मी. (सर्वसाधारण)<br>८६ सें.मी. (फूगवून)<br>(किमान ०५ से.मी.छाती फुगविणे आवश्यक आहे). | उंची १६५ सें.मी. (किमान)<br>वजन ५० किलो (किमान)<br>छाती ८१ सें.मी. (सर्वसाधारण)<br>८६ सें.मी. (फूगवून)<br>(किमान ०५ से.मी.छाती फुगविणे आवश्यक आहे). |

वरील नमूद केलेल्या अटी /शर्ती व्यतिरिक्त खालील दर्शविल्याप्रमाणे वैद्यकीय पात्रता असणे आवश्यक आहे.

**वैद्यकीय मापदंड :**

०१. डोळे : अर्जदार डोळयांनी रंगहीन नसून चष्म्याशिवाय दृष्टी ६/६ असणे आवश्यक आहे.
०२.कोणत्याही प्रकारचे कान, नाक व घसाचे आजारे नसणे. व्यवस्थित ऐकू येणे.
या व्यतिरिक्त अर्जदार खाली दिलेल्या आजारातून मुक्त असणे गरजेचे आहे.
०३ .हाडांचा किंवा सांध्याचा आजार.
०४.पूर्व मानसिक आजार
०५.त्वचेचा आजार
०६.सपाट पाय किंवा गुडघे टेकलेले
०७.रक्त वाहिनी फूगणे
०८.तिरकस डोळे
०९.कोणत्याही प्रकारचे शारीरिक व्यंगत्व नसावे.
१०.मोठया प्रमाणात शस्त्रकिंया झालेली नसावी
११.ऐकू न येणे किंवा बोलतांना अडथळणे (बोबडेपणा)
१२.कोणत्याही प्रकारचे अपंगत्व, जेणेकरुन अग्निशमन किंवा विमोचन कार्य करतांना त्रास होऊ शकतो.

**ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याची कार्यपध्दती व सूचना :-**

इच्छुक व पात्र असलेल्या उमेदवारांनी खालील नमूद केलेल्या संकेतस्थळाच्या लिंकवर जाऊन **दि.१५.०६.२०२५ ते दि.१५.०८.२०२५** या कालावधीत ऑनलाईन अर्ज भरणे.

**संकेतस्थळ :**
www.mahafireservice.gov.in

## ऑनलाईन अर्ज भरताना महत्वाच्या सूचना

१. जाहिरात व्यवस्थित वाचणे
२. ज्या पाठयक्रमासाठी अर्ज करणार आहात त्या पाठयक्रमाच्या अटी व शर्ती व्यवस्थित तपासून घेणे.
३. फॉर्म भरण्याआधी **User ID** व **Password** तयार करणे व फॉर्म भरताना व पुढील कोणतीही प्रक्रिया करताना त्याचा वापर करणे.
४. अंतिम दिनांकाच्या अगोदर पूर्ण अर्ज शुल्कासह भरणे. भरलेले शुल्क परत केले जाणार नाही
५. आपण तयार केलेले **User ID** व **Password** ने नमूद केलल्या संकेस्थळावर प्रवेशासाठी अर्ज **(Fill Application Form)** या शीर्षकाखाली फॉर्म पूर्णपणे भरुन झाल्यावर त्याची प्रिंट काढून स्वतःकडे एक प्रिंट ठेवणे (सदर अर्जाची प्रिंट शेक्षणिक कागदपत्रांची तपासणी व शारीरिक पात्रता पडताळणीच्या वेळी बघितली जाईल) अर्ज भरताना खालील नमूद केलेली माहिती योग्य रितीने भरणे.

   अ. स्वतःबददल पूर्ण माहिती **(Personal Information)**
   ब. शैक्षणिक माहिती **(Educational Details)**
   क. वैदयकीय माहिती **(Medical Information)**
   ड . इतर माहिती **(Other Information)**
   इ . ईमेल आयडी
   ई . मोबाईल नं.

   उ. **छायाचित्र व स्वाक्षरी अपलोड करण्यासंबंधी माहिती.**
   १. अपलोड करावयाचे छायाचित्र उंची व रुंदी प्रत्येकी २०० **pixel** असलेले असणे आवश्यक आहे, तसेच छायाचित्राचे आकारमान ३ **KB** ते ५० **KB** च्या दरम्यान असावे.
   २. उमेदवाराने स्कॅन स्वाक्षरी सादर करणेसाठी को-या कागदावर ५ **X** ४.५ सेमी आकाराचा एक आयत काढा व त्या आयतामध्ये उमेदवाराने स्वतः काळया शाईच्या पेनने स्वाक्षरी करुन ती प्रतिमा स्कॅन करावी. स्वाक्षरीच्या प्रतिमेची उंची ६० पिक्सल आणि रुंदी १४० पिक्सल असावी आणि प्रतिमेचा आकारमान ३ **KB** ते ५० **KB** च्या दरम्यान असावी.

६. जो पर्यंत पूर्ण माहिती भरली जात नाही व नमूद केलेली प्रवेश शुल्क भरले जात नाही तो पर्यंत ऑनलाईन प्रवेश फॉर्म पूर्ण भरलेली आहे असे गृहीत धरला जाणार नाही.

**७.** वर नमूद केलेल्या संकेतस्थळांवर जाऊन वेळोवेळी अर्जाची व परीक्षेची स्थिती तपासणे. परीक्षेच्या काही दिवस अगोदर प्रवेश पत्र उपलब्ध होईल. कोणत्याही प्रकारचे लेखी स्वरुपात कळविले जाणार नाही याची नोंद घ्यावी. **शैक्षणिक कागदपत्रांची तपासणी व शारीरिक पात्रता पडताळणी दि.०८.०९.२०२५ पासून पुढे व ऑनलाईन परीक्षेची तारीख शारीरिक पात्रता पडताळणीनंतर कळविण्यांत येईल.**

८. शैक्षणिक कागदपत्रांची तपासणी व शारीरिक पात्रता पडताळणी ही महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय, महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी, हंस भुग्रा मार्ग, विदयानगरी, सांताक्रुझ पूर्व, मुंबई ४०० ०९८ येथे घेण्यांत येईल तर ऑनलाईन परीक्षा आपण निवडलेल्या परीक्षा केंद्रात घेण्यांत येतील.

९. **परिक्षा शुल्क भरणा ( ना परतावा)**

| **वर्ग** | **अग्निशामक पाठयक्रम** | **उपस्थानक अधिकारी व अग्निप्रतिबंधक अधिकारी पाठयक्रम** |
|---|---|---|
| **खुला** | **रु.६००/-** | **रु.७५०/-** |
| **राखीव (अनु.जाती/जमाती/विमुक्त जाती व भटक्या जमाती/विशेष मागास प्रवर्ग व इतर मागास प्रवर्ग/ईडब्ल्यूएस प्रवर्ग)** | **रु.५००/-** | **रु.६००/-** |

अ. परीक्षा शुल्काचा भरणा हा फक्त **Online** पध्दतीनेच करावयाचा आहे. या नमूद केल्याप्रमाणे **Online** पध्दती व्यतिरिक्त इतर कोणत्याही पध्दतीने भरणा केलेले परीक्षा शुल्क हे विचारात घेतले जाणार नाही.

ब. उमेदवाराने दोन्ही पाठयक्रमासाठी अर्ज केला असल्यास विहित केल्याप्रमाणे प्रत्येक पाठयक्रमासाठी त्याने परीक्षा शुल्क एकाच वेळी भरणे आवश्यक आहे.

क. **Online** परीक्षा शुल्क भरण्याची पध्दती

**(i)** १. क्रेडिट कार्ड
२. डेबिट कार्ड
३. इंटरनेट बँकींग
४. युपीआय भिम

**(ii)** उमेदवार आपल्या सोयीनुसार वरीलपैकी कोणत्याही एका पध्दतीनुसार शुल्क भरणा करु शकतात.

**(iil)** उमेदवाराला जर वीज पुरवठा किंवा इंटरनेट सेवा खंडित झाल्यामुळे शुल्क भरणा करता आला नाही तर त्याने पुन्हा लॉगइन करुन भरणा प्रक्रिया पूर्ण करावी.

**(iV)** शुल्क भरणा झाल्यावर उमेदवाराला भरणा यशस्वी म्हणून संदेश मिळेल. भरणा केलेल्या शुल्काची नोंद/माहिती अर्जामध्ये आपोआप येईल.

**(v)** ऑनलाईन पध्दतीने परीक्षा शुल्काचा भरणा केल्यानंतर उमेदवाराला त्याच्या प्रोफाईलमध्ये परीक्षा शुल्क भरणा झाला आहे किंवा कसे याची स्थिती Status अवगत हीईल. त्याची उमेदवाराने अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वीच तपासणी करुन खात्री करणे अथवा परीक्षा शुल्काचा भरणा झाल्यावर स्थिती उपलब्ध नसल्यास पुन्हा शुल्क भरण्याची कार्यवाही करणे आवश्यक आहे. विहित दिनांकानंतर या संदर्भातील कोणत्याही प्रकारच्या तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.

**पाठयक्रमासाठी येणारा अंदाजित खर्चाचा तपशिल :**

| खर्चाचा तपशिल | अग्निशामक पाठयक्रम | उपस्थानक अधिकारी व अग्निप्रतिबंधक अधिकारी पाठयक्रम |
|---|---|---|
| प्रशिक्षण शुल्क | रु.१३,०००/- | रु.३६,४००/- |
| निवास खर्च | रु.५०/- ते रु.७०/- प्रतिदिन | रु.१००/- प्रतिदिन |
| ट्रेनी ॲमिनिटी | रु.२०००/- | रु.३०००/- |
| भोजन खर्च (अंदाजे) | रु.३००/- प्रतिदिन | रु.३००/- प्रतिदिन |
| गणवेष व इतर साहित्य (अंदाजे) | रु.१०,०००/- | रु.१०,०००/- |

**सूचना :**

१. वरील नमूद केलेला खर्च हा अंदाजित आहेत व त्यामध्ये बदल होऊ शकतो.
२. पाठयक्रमाचे शुल्क नमूद केलेल्या दिनांकाच्या आत भरणे अनिवार्य आहे. अंतिम दिनांकापर्यंत शुल्क भरले नाही तर आपला प्रवेश नाकरण्यांत येईल.
३. भरलेले शुल्क कोणत्याही परिस्थितीत परत केले जाणार नाही.
४. जर मध्येच पाठयक्रम सोडल्यास भरलेले शुल्क परत केले जाणार नाही.

**शैक्षणिक कागदपत्रांची तपासणी व शारीरिक पात्रता पडताळणीच्या वेळी लागणार महत्वाची कागदपत्रे**

**शैक्षणिक कागदपत्रांची तपासणी व शारीरिक पात्रता पडताणीचे वेळापत्रक www.mahafireservice.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यांत येईल. सदर पडताळणीच्या वेळी खालीलप्रमाणे शैक्षणिक मूळ कागदपत्राचा संच तसेच त्याच्या छायांकित प्रती स्वस्वाक्षरीने साक्षांकित करुन आणाव्यात.**

१. ऑनलाईन भरलेल्या अर्जाची प्रिंट (रंगीत पासपोर्ट आकाराच्या अलीकडील फोटोसह)
२. शैक्षणिक प्रमाणपत्रे/मार्कशिट १०वी/१२ वी/पदवी परीक्षा उत्तीर्ण तसेच आटीआय/डिप्लोमा इत्यादी.

३. सक्षम प्राधिका-याचे जातीचे प्रमाणपत्र (राखीव प्रवर्गातील उमेदरांसाठी )
४. जन्म दाखला/शाळा सोडल्याचा दाखला/१० वी चे बोर्ड प्रमाणपत्र.
५. रहिवाशी दाखला (तहसिल कार्यालयाने दिलेला)
६. खेळाचे प्रमाणपत्र (शालेय/जिल्हास्तर/राज्यस्तर/राष्ट्रीयस्तर) उपलब्ध असल्यास
७. ड्रायव्हिंग लायसन्स (हलका/जड) उपलब्ध असल्यास
८. एन.सी.सी. प्रमाणपत्र ( ए/बी/सी प्रमाणपत्र ) उपलब्ध असल्यास
९. नागरी संरक्षण दलाचे प्रमाणपत्र, उपलब्ध असल्यास
१०.होमगार्ड प्रशिक्षण प्रमाणपत्र, उपलब्ध असल्यास
११.संरक्षण दलात कार्यरत असलेले सैनिक/माजी सैनिक पालकांचे प्रमाणपत्र
१२.वैदयकीय प्रमाणपत्र (दिलेल्या नमुन्यानुसार वैदयकीय अधिका-याकडून)

**शैक्षणिक कागदपत्राची तपासणी व शारीरिक पात्रता पडताळणीचे ठिकाण :-**

महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय, महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी, हंस भुग्रा मार्ग, विदयानगरी, सांताक्रुझ पूर्व, मुंबई ४०० ०९८

याबाबतचे वेळापत्रक www.mahafireservice.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यांत येईल. उमेदवारांनी नमूद केलेल्या तारखेस प्रवेशपत्रासह हजर राहणे. दिलेल्या तारखेस हजर न झाल्यास त्या उमेदवारास पुढच्या प्रक्रियेतून बाद करण्यांत येईल. **शैक्षणिक कागदपत्राची तपासणी व शारीरिक पात्रता पडताळणीचे प्रवेशपत्र एक आठवडा अगोदर उपलब्ध होईल.**

**पाठयक्रमासाठी निवड प्रक्रिया :**

१. ऑनलाईन परीक्षा व शैक्षणिक कागदपत्रे/शारीरिक पात्रता पडताळणीत पडलेल्या गुणांच्या आधारावर गुणवत्ता यादी तयार करण्यांत येईल. गुणवत्तेनुसार पाठयक्रमात प्रवेश दिला जाईल.
२. अग्निशामक पाठयक्रमासाठी प्रादेशिक प्रशिक्षण केंद्राच्या आधारावर उमेदवार प्रशिक्षणसाठी निवडले जातील. ज्या उमेदवारांची निवड जानेवारी महिन्यात होणार नाही त्यांना जुलै महिन्या होणा-या पाठयक्रमासाठी निवड करण्यांत येईल. कोणत्याही प्रकारची प्रतिक्षायादी असणार नाही. अधिकारी पाठयक्रमाची क्षमता ४० इतकी असणार आहे.
३. ज्या उमेदवारांनी पूर्णपणे अर्ज व प्रवेश शुल्क भरले आहेत त्यांनाच कागदपत्र तपासणी व शारीरिक पात्रता पडताळणीसाठी बोलाविण्यांत येईल.
४. शैक्षणिक कागदपत्रांची व शरीरिक पात्रता पडताळणीत पात्र व अपात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी www.mahafireservice.gov.in या संकेतस्थळावर पाहता येईल.
५. पाठयक्रम प्रवेशाबाबत वेळोवेळी संकेतस्थळावर माहिती प्रसिध्द करण्यांत येईल.
६. पाठयक्रम ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेशी संबंधित सर्व बाबींबाबत संचालक, महाराष्ट्र अग्निश्मन सेवा यांचा निर्णय हा अंतिम राहिल. तसेच तो सर्व उमेदवारांना बंधनकारक राहील. याबाबत केल्या जाणा-या विचारणा व पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही.

**शैक्षणिक कागदपत्रांची तपासणी व शारीरिक पात्रता पडताळणी :**

**जे उमेदवार शैक्षणिक कागदपत्रांची तपासणी व शारीरिक पात्रता पडताळणी (उंची, वजन, छाती व वैदयकीय ) चाचणीमध्ये पात्र ठरणार नाहीत ते या प्रक्रियेतून बाद होतील.**

**शारीरिक चाचणी :**

उंची   १६५  सें.मी. (किमान)
वजन   ५० किलो  (किमान)

छाती   ८१ सें.मी. (सर्वसाधारण)
       ८६ सें.मी. (फूगवून)

(किमान ०५ से.मी.छाती फुगविणे आवश्यक आहे)

**एकूण गुण  - १०**

| उंची (सेमीमध्ये) | गुण |
|---|---|
| 165 - 168 | 5 |
| 169-171 | 5.5 |
| 172-174 | 6 |
| 175-177 | 7 |
| 178-180 | 8 |
| 181-183 | 9 |
| 183 पेक्षा जास्त | 10 |

**छाती**

**एकूण गुण  -** 10

| छाती  किमान  81 सें.मी. (सर्वसाधारण)<br>86 सें.मी. (फूगवून)<br>(किमान 05 सेमी छाती फुगविणे आवश्यक आहे) | गुण |
|---|---|
| 6 cm | 5 |
| 7 cm | 6 |
| 8 cm | 7 |
| 9 cm | 8 |
| 10 cm | 9 |
| 11 cm व अधिक | 10 |

**अतिरिक्त गुण :**

**खालील नमूदकेल्याप्रमाणे अतिरिक्त गुण इतर नैपुण्य व प्रमाणपत्राच्या आधारे दिले जातील.**

१. वाहन चालविण्याचा परवाना - LMV - ०२ गुण
- HMV - ०३ गुण

२. NCC - A प्रमाणपत्र ०१ गुण
B प्रमाणपत्र ०२ गुण
C प्रमाणपत्र ०३ गुण

३. सिविल डिफेन्स कोर्स ०२ गुण

४ होमगार्ड प्रशिक्षण ०२ गुण

५ अतिरिक्त शिक्षण अग्निशामक पाठयक्रमासाठी (१२ वी २ गुण, पदवी ०३ गुण)
अधिकारी पाठयक्रमासाठी (उच्च पदवी ०५ गुण)

**खेळासाठी मान्यताप्राप्त (संस्था मैदानी खेळासाठी)**

१. आंतरशालेय – ०२ गुण
२. जिल्हास्तर – ०३ गुण
३. राज्यस्तर – ०४ गुण
४. राष्ट्रीयस्तर – ०५ गुण

**शैक्षणिक व इतर कागदपत्रांची तपासणी**

१. सर्व मूळ कागदपत्रांची तपासणी शारीरिक पात्रता पडताळणीच्या वेळी करण्यांत येईल.
२. मूळ कागदपत्रे तपासणी झाल्यानंतर परत करण्यांत येतील.

**ऑनलाईन परीक्षा :**

१. जे उमेदवार शारीरिक चाचणीत उत्तीर्ण होतील तेच उमेदवार ऑनलाईन परीक्षेसाठी पात्र होतील.
२. ऑनलाईन परीक्षेची तारीख नमूद केलेल्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यांत येईल. ऑनलाईन परीक्षा पुढील विषयांवर आधारीत असेल.

एकूण १०० गुणांची बहुपर्यायी प्रश्नावली असेल. परीक्षेचा कालावधी **दिड ते दोन तास** असेल, ज्यामध्ये

अ. मराठी
ब. इंग्रजी
क. सामान्य ज्ञान विज्ञान विषयासह
ड बौध्दिक क्षमता चाचणी गणित विषयावर

**गुणवत्ता यादी (मेरीट लिस्ट)**

१. पाठयक्रमात प्रवेश निश्चिती (मेरीट लिस्ट ही उपलब्ध जागांच्या क्षमतेनुसार) शारीरिक चाचणी/कागदपत्रांची तपासणी (५० गुण) व लेखी परीक्षा - ऑनलाईन (१०० गुण) मिळालेल्या एकूण १५० गुणांपैकी **किमान ५० गुण** हे उपस्थानक व अग्नि प्रतिबंधक पाठयक्रमासाठी व **किमान ४५ गुण हे अग्निशामक पाठयक्रमासाठी मिळविणे आवश्यक आहे. या गुणांच्या आधारावर निवडसूची तयार करण्यांत येईल.** त्याखालील गुण मिळविलेल्या उमेदवारांचा विचार करण्यांत येणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

२. गुणवत्ता यादीनुसार पाठयक्रमात प्रवेश दिला जाईल. त्या अगोदर वैदयकीय चाचणी अपेक्षित आहे.
३. कोणत्याही कारणास्तव प्रतिक्षा यादी असणार नाही. सदर प्रक्रिया ही एकाच वर्षाकरीता असणार आहे. पुढील वर्षी नविन प्रक्रिया सुरु होईल.

## इतर माहिती :

१. अपूर्ण अर्ज गृहीत धरले जाणार नाही. (जसे फोटो, सही, फी न भरलेली)
२. शैक्षणिक कागदपत्रांची तपासणी/शारीरिक चाचणीसाठी येण्याजाण्यासाठीचा प्रवास खर्च व राहण्याची सोय उमेदवारास स्वतःच करावी लागेल. याबाबतचा कोणताही मोबदला दिला जाणार नाही.
३. आहे त्या स्थितीत व वातावरणात शारीरिक चाचणी घेण्यांत येईल.
४. स्वखर्चाने परीक्षेसाठी यावे लागेल.
५. हे प्रशिक्षण केंद्र कोणत्याही प्रकारे होणा-या दुःखापतीस किंवा अपघातास प्रवेश निवड प्रक्रियेस जबाबदार राहणार नाही. याबाबतचे प्रतिज्ञापत्र उमेदवारास दयावे लागेल.
६. निवड प्रक्रियेमध्ये कोणत्याही टप्प्यावर अडचणी निर्माण होऊ नये म्हणून उमेदवाराने पाठयक्रमासाठी अर्ज भरताना त्यातील अटी / शर्ती व्यवस्थित वाचून घेणे गरजेचे आहे.
७. ज्या वेळेस पाठयक्रम सुरु होणार असेल त्या वेळेस उमेदवाराने हजर होणे गरजेचे आहे.
८. **शारीरिक चाचणी, ऑनलाईन परीक्षा, परीक्षेचा निकाल याबाबतच्या माहितीसाठी वेळोवळी www.mahafireservice.gov.in या संकेत स्थळाला भेट दयावी.**

## पाठयक्रमातील उपस्थिती :

१. दोन्ही पाठयक्रम निवासी असून उमेदवारास २४ X ०७ प्रशिक्षण केंद्रात राहणे बंधनकारक आहे.
२. प्रत्येक वर्ग व कवायती सक्तीच्या असून त्यामध्ये भाग घेणे अनिवार्य आहे.
३. दिलेल्या वेळेवर येणे अपेक्षित आहे.
४. प्रशिक्षण सत्र सोमवार ते शनिवार सकाळी ०६.३० ते सायंकाळी ०५.३० वा. पर्यंत चालेल (रविवार वगळता)
५. प्रशिक्षण सत्रात ८० टक्के उपस्थिती अनिवार्य आहे.
६. कोणत्याही वर्गात १० मिनिटानंतर उशीरा आल्यास वर्गात घेतले जाणार नाही.
७. कोणत्याही प्रकारची पूर्व सूचना न देता वर्गात किंवा प्रशिक्षण केंद्रात गैरहजर राहिल्यास प्रशिक्षणार्थ्यांवर योग्य ती कार्यवाही करण्यांत येईल.
८. कोणताही प्रशिक्षणार्थी सलग सहा दिवसा पेक्षा जास्त काळ गैरहजर राहिल्यास त्याचे नांव प्रशिक्षण सत्रातून कमी करण्यांत येईल.

**गणवेष व इतर साधनसामुग्री :**

अग्निशमन सेवा ही एक गणवेषधारी संघटना असून या सेवेस शोभेल असे अनुशासन अपेक्षित आहे. त्याकरीता रोजचे रोज दाढी, हेअरकट, शु-पॉलिश, बेल्ट व गणवेष व्यवस्थित व नीटनेटका असणे गरजेचे आहे. नसल्यास प्रशिक्षणार्थ्यांवर योग्य ती कार्यवाही करण्यांत येईल.

**अनुशासन :**

१. प्रशिक्षणार्थ्यांकडून योग्य प्रकारची शिस्त बंधनकारक आहे. वर्गात असो, मैदानात किंवा होस्टेल मध्ये, सर्व वेळी त्याचेकडून अनुशासनाचे पालन होणे अनिवार्य आहे.
२. वेळोवेळी निटनेटकेपणा व चांगल्या गणवेषात असणे गरजेचे आहे. स्वच्छता हा सुध्दा अनुशासनाचा एक भाग म्हणून बघितला जातो.
३. कोणत्याही प्रकारचे व्यसन दारु, धुम्रपान, तंबाखू, पत्ते खेळणे यावर प्रतिबंध आहे. जर एखादा प्रशिक्षणार्थ्याने तसे केल्याचे आढळून आल्यास त्याचेविरुध्द योग्य ती कारवाई करण्यांत येईल.
४. कौणत्याही प्रकारची गैरवर्तणूक किंवा रॅगिंग सहन केले जाणार नाही. योग्य ती कारवाई करण्यांत येईल.
५. कोणतीही अडचण किंवा त्रास झाल्यास सर्वप्रथम केंद्रातील वरिष्ठ प्रशिक्षण अधिकारी यांच्या निदर्शनास आणून दयावे. तरी देखील समाधान न झाल्यास सदर बाब संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा यांचे निदर्शनास आणून दयावी.

**प्रमाणपत्र :**

१. जे प्रशिक्षणार्थी उप अग्निशमन अधिकारी व अग्निप्रतिबंधक अधिकारी तसेच अग्निशामक प्रशिक्षण पाठयक्रमात उत्तीर्ण होतील त्यांना महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमीमार्फत पाठयक्रमाचे प्रमाणपत्र व गुणपत्रिका देण्यांत येतील.
२. पाठयक्रमाचे प्रमाणपत्र व गुणपत्रिका परीक्षा झाल्यापासून ६० दिवसांच्या आत देण्यांत येईल.

**अधिक माहितीसाठी www.mahafireservice.gov.in या संकेतस्थळावर भेट देणे आणि टोल फ्री क्रमांक ९६०४४०७४०० येथे संपर्क साधू शकता.**

**किंवा**

**महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय, महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी, हंस भुग्रा मार्ग, विदयानगरी, सांताक्रुझ पूर्व, मुंबई ४०० ०९८ येथे भेट देणे.**

**स्थळ : मुंबई**
**दिनांक : १५.०६.२०२५**

**सही /-**
**संचालक**
**महाराष्ट्र अग्निशमन सेवा.**

*********